# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत

(दुसरा व चौथामजला) सर्व्हे नं. ८३२ ए,भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे ४११००४

दूरध्वनी क्र.: 020 -29709617 वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-www.mscegcctbc@gmail.com


**परीक्षा प्राधान्य/ महत्वाचे**

जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/आ७/सं.टा/जाने-२०२६/ 6261

दिनांक :- 23/12/२०२५.

प्रति,

संस्थाचालक

शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,

महाराष्ट्र व गोवा राज्य.

**विषय : शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जानेवारी - २०२६ परीक्षेतील बॅच बदलसाठी सशुल्क लिंक पुरविणेबाबत.**

**संदर्भ :-** सदर परीक्षेची अधिसूचना दि. १८/०९/२०२५.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) दि. ०५/०१/२०२६ ते १७/०१/२०२६ या कालाधीमध्ये आयोजित केलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, **परीक्षा परिषदेकडून विद्यार्थी हित लक्षात घेता गरजेनुसार बॅच बदल देण्यात येत आहे. बॅच बदलासाठी संस्था लॉगीनव्दारे सशुल्क लिंक दि. २६/१२/२०२५ सकाळी १०:०० पासून ते दि. ३०/१२/२०२५ रात्री ११ :५९ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. प्रति विद्यार्थी प्रति विषय बॅच बदलाचे शुल्क रु. १००/- राहील.**

प्राप्त झालेल्या अर्जावर त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी संबंधित संस्थेच्या लॉगीनव्दारे नविन बॅच बाबतचे प्रवेशपत्र निर्गमित करण्यात येतील तसेच निश्चित केलेल्या केंद्रांतर्गतच बॅच बदल अनुज्ञेय राहील.

परीक्षा परिषदेकडून संस्थांना पुरविण्यात आलेल्या लिंकव्दारेच प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येईल, ई-मेलव्दारे अथवा अन्य कोणत्याही माध्यमातून प्राप्त अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच केंद्रावरील उपलब्धतेनुसारच बॅच बदल देण्यात येईल. परीक्षा केंद्रावर संभाव्य जागा उपलब्ध नसल्यास बॅच बदल देणे शक्य होणार नाही. याबाबत सर्व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.

23/12/25

**(डॉ. नंदकुमार बेडसे- भा.प्र.से.)**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद**
**पुणे-०४.**

**प्रत :-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सर्व.
३. शिक्षण निरीक्षक, बृन्मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)